**– विशेष खटला क्र. ५२/२०२४ मधील नि.क्र.०३ वरील आदेश –**

(घोषित दि. १०/०४/२०२५)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार/आरोपी अनिल हिरामन राठोड , यांनी कुडाळ पोलीस ठाणे, गुन्हा रजि.क्र.४९/२०२४, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये त्यांच्या स्वतःच्या मालकीची रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) परत मिळणेकामी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४९७ नुसार दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कुडाळ पोलीस ठाणे, गुन्हा रजि.क्र.४९/२०२४, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये अर्जदार यांच्या स्वत:च्या मालकीची रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) पोलिसांनी गुन्हयाचे कामी जप्त केलेली आहे. दोषारोपपत्रातील नमूद मुद्देमाल अनुक्रमांक ३ मध्ये भारतीय चलनी नोटांचे एकूण आठ बंडल असून त्यामध्ये ५००/– रुपये दराच्या एकुण ६८१ , २०/– रुपये दराच्या ४, आणि १०/– रुपयाची एक नोट अशी एकूण रक्कम रुपये ३,४०,५९०/– तपशीलवार नमूद आहे.

३. अर्जदार यांचे पुढे असेही कथन आहे की, सदर रक्कमेपैंकी रक्कम रुपये १,२०,०००/– ही अर्जदार/आरोपी यांनी त्यांचे कोल्हापूर येथील मित्र श्री.विलास रामू मुळे यांचेकडून घर दुरुस्तीसाठी हात उसणे घेतली होती. तसेच वनक्षेत्रपाल (प्रा.)कुडाळ यांचे कार्यालयात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत

सन २०२३–२४ मध्ये वन्यजीव व्यवस्थापन व निसर्ग संरक्षण योजनेखालील कामास मजूर नेमावयाचे होते त्यासाठी अर्जदार/आरोपी यांनी श्री. लक्ष्मण सावंत, श्री.पांडुरंग करमळकर, श्री. आशिष सावंत यांची नेमणूक केली होती, सदर मजुरांची मजुरी ही वार्षिक रक्कम रुपये २,२५,७००/– इतकी होती. सदरची रक्कम ही शासनाकडून मिळणेस विलंब होणारा होता, त्यामुळे अर्जदार/आरोपी यांनी श्री. रामदास कृष्णा दळवी यांचेकडून दि. ०५/०९/२०२३ रोजी रोख रक्कम रुपये ६०,०००/– , दि. १६/१०/२०२३ रोजी रोख रककम रुपये ५५,०००/– तर दि. २८/१२/२०२३ रोजी रोख रककम रुपये ६०,०००/– आणि दि. २२/०१/२०२४ रोजी रोख रक्कम रुपये ५५,०००/– हात उसणे घेतलेले होते. सदरची रक्कम घेतलेवर अर्जदार/आरोपी यांनी वर नमूद सर्व मजूर यांना मजुरी म्हणून अदा केलेली होती. तदनंतर वर नमूद चारही मजूर यांचे खात्यात त्यांच्या मजुरीचे पैसे शासनाकडून जमा झालेवर सदर मजुरांनी अर्जदार/आरोपी यांना त्यांचेकडील हात उसणे घेतलेली मजुरीची रककम मजुरांनी रोख स्वरुपात अर्जदार/ आरोपी यांना अदा केलेली आहे. सदरची रक्कम अर्जदार/आरोपी यांच्या गाडीतून गुन्हयाचे कामी तपासिक अंमलदार यांनी जप्त केलेली आहे.

४. अर्जदार यांचे पुढे असेही कथन आहे की, अर्जदार/आरोपी यांनी त्यांचे कोल्हापूर येथील मित्र विलास मुळे यांचेकडून घेतलेली रक्कम रुपये १,२०,०००/– तसेच श्री.रामदास कृष्णा दळवी यांचेकडून घेतलेली हात उसणे रक्कम सुध्दा त्यांना परत दयावयाची आहे. सदरची रक्कम अर्जदार/आरोपी यांचेकडून परत मिळणेसाठी श्री. विलास रामू मुळे व रामदास

दळवी यांनी अर्जदार/आरोपी यांचेकडे तगादा लावला आहे. त्यामुळे अर्जदार/आरोपी यांना मानसिक त्रास होत आहे. तसेच त्यांची समाजातील प्रतिष्ठा मलिन होत आहे. सध्या आरोपी हे शासकीय सेवेतून निलंबित आहेत. त्यामुळे आरोपी यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची झालेली आहे. अर्जदार/आरोपी यांनी संबंधिताकडून हात उसणे घेतलेल्या रककमेचे मुल्य मोठे असल्याने संबंधित व्यक्ती तगादा लावत आहेत. त्यामुळे रक्कम मिळणे अत्यंत गरजेच व आवश्यक झालेले आहे.

५. अर्जदार यांचे पुढे असे म्हणणे आहे की, सदरची रक्कम कुडाळ पोलीस स्टेशन याचे ताब्यात जप्त केल्यापासून ती तशी पडून आहे. खटल्याचा निकाल लागणेस बराच कालावधी जाणारा आहे. त्यामुळे सदर रक्कम अर्जदार/आरोप यांचे ताब्यात न मिळाल्यास अर्जदारांचे दैनंदिन कामकाजावर व त्यांचे मानसिक स्थितीवर विपरीत परिणाम होणार असून त्यांना मानसिक त्रास होणार आहे. सदरची रक्कम अर्जदार/आरोपी त्यांचे ताब्यात दिल्यास मे.न्यायालय हुकूम करेल त्याप्रमाणे सर्व अटींचे पालन करतील. सबब, अर्जदार यांनी सदर रक्कम योग्य अटी व शर्तींवर परत मिळावी, अशी विनंती केली आहे.

६. अभियोग पक्षातर्फे विद्वान विशेष सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.०५ लगत आणि तपासी अंमलदार यांनी नि.क्र.०६ लगत म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे म्हणणे प्रमाणे गुन्हयाकामी जप्त करणेत आलेली रक्कम ही आरोपी यांनी त्यांचे कोल्हापूर येथील मित्र श्री.विलास रामू मुळे यांचेकडून घर दुरुस्तीसाठी हात उसणे घेतली होती याबाबत कोणताही पुरावा आरोपी यांचेकडून उपलब्ध

झालेला नाही. त्यामुळे आरोपी यांचे वाहनात मिळून आलेली रक्कम रुपये ३,४०,५९०/– ही सापळा कारवाईतीलच आहे. सबब, सदरची रक्कम आरोपी यांचे ताब्यात देण्यात येवू नये.

७. अर्जदार यांचेतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस.एस.साटम आणि अभियोग पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता श्री.आर.व्ही.देसाई यांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही पक्षांनी आपआपल्या कथनांनुसार युक्तिवाद केल्यामुळे सदरचा युक्तिवाद पुन्हा उध्दृत केलेला नाही.

८. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखाच्या अवलोकनातून असे दिसते की, प्रस्तुतची रोख रक्कम ही अर्जदार अनिल हिरामन राठोड यांच्या स्वत:च्या मालकीची आहे असे दिसते. वस्तुतः रक्कमेच्या मालकीबाबत कोणताही वाद उपस्थितीत झालेला नाही. सदरची रक्कम अर्जदार यांना परत न देता तशी पोलीस ठाण्यात राखून ठेवल्यास अर्जदाराचे अपरिमित नुकसान होणार आहे हे अर्जदारांचे कथन संयुक्तिक आहे. मा.सर्वोच्च न्यायालय यांनी **सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द स्टेट ऑफ गुजरात (ए.आय.आर.२००३ एससी ६३८)** या न्यायनिवाडयामध्ये असे म्हटले आहे की, गुन्हयातील कोणतीही मालमत्ता जर गुन्हयातील मुद्देमाल असेल तर पोलिस स्टेशनमध्येच पडून राहिल्यास त्याचे नुकसान होण्याऐवजी ती मालमत्ता संबंधित मालकास योग्य अटी, शर्तींवर देण्यात यावे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील तीच परिस्थिती दिसून येते. जप्त मुद्देमालाचे नुकसान टाळणेकरिता व पोलिसांवरील सुरक्षेचा भार कमी करणेसाठी रोख रककम परतीचा अर्ज योग्य अटी व शर्तींवर मंजूर करणे योग्य वाटते. त्यामुळे न्यायाचे

हितासाठी कुडाळ पोलीस ठाणे, गुन्हा रजि.क्र.४९/२०२४, मध्ये जप्त करणेत आलेले रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) अर्जदार यांना परत करणे योग्य व उचित होईल. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. कुडाळ पोलीस ठाणे, गुन्हा रजि.क्र.४९/२०२४, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये त्यांच्या स्वतःच्या मालकीची रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) अर्जदार अनिल हिरामन राठोड रा. ओरोस, जैतापकर कॉलनी, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग यांना रक्कम रुपये ७,००,०००/– (रक्कम रुपये सात लाख मात्र) इतक्या रक्कमेच्या बंधपत्रावर खालील नमूद अटीस अधीन राहून परत करण्यात यावी.

अ ) तपासी अंमलदार यांनी अर्जदार याचे ताब्यात रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) देताना अर्जदारांकडून रोख रक्कमेच्या झेरॉक्स प्रती अर्जदारांच्या खर्चाने काढाव्यात.

ब ) तपासी अधिकारी यांनी अर्जदार यांचे ताब्यात रोख रक्कम रुपये ३,४०,५९०/– (रक्कम रुपये तीन लाख चाळीस हजार पाचशे नव्वद मात्र/–) देताना पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करावा.

३. बंधपत्र केसच्या अंतिम हुकूमास अधीन राहील.

४. संबंधित पोलीस ठाणे यांना आदेशाची प्रत पाठविणेत यावी.

DESHMUKH VIDYA SHARADRAO
Digitally signed by DESHMUKH VIDYA SHARADRAO
Date: 2025.04.15 16:59:13 +0530

दिनांक –१०/०४/२०२५ (श्रीमती व्ही.एस.देशमुख)
सिंधुदुर्ग – ओरोस. अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग ओरोस.